# नवमहाराष्ट्र संघाची पंचविशी

मिलिंद ढमढेरे

**अखिल भारतीय पातळीवरील किंवा राष्ट्रीय पातळीवरील खोखो स्पर्धा म्हटल्या की, आपोआपच पुण्याचे नांव झटकन डोळ्यापुढे येते. आज जे कांही खोखोचे क्षेत्र आहे, त्या क्षेत्रामध्ये पुण्याचे नांव उज्ज्वल करणारी, ते स्थान टिकविण्यासाठी अव्याहतपणे गेली पंचवीस वर्षे प्रयत्न करणारी प्रमुख संस्था म्हणजे नवमहाराष्ट्र संस्था असे म्हणावे लागेल .**

सर परशुराम भाऊ महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर सराव करणाऱ्या नवमहाराष्ट्र संघाने आजपर्यंत पन्नासहून अधिक राष्ट्रीय पातळीवरील व अखिल भारतीय आंतर-विद्यापीठ स्तरावरील खेळाडू निर्माण केले आहेत. अर्थात राष्ट्रीय पातळीवर किती खेळाडू निर्माण केले यापेक्षा देशातील खोखो क्षेत्रामध्ये नवमहाराष्ट्र संघाने व या संघातील खेळाडूंनी नांवलौकिक निर्माण केला आहे. पुण्याचे आशास्थान राखले आहे.

नवमहाराष्ट्र संघाची स्थापना २६ जानेवारी १९६० रोजी गुरुवर्य शंकरराव पाटणकर यांच्या प्रयत्नामुळे झाली. या संस्थेच्या स्थापनेमध्ये पाटणकर यांचा फार मोठा मोलाचा वाटा होता. त्यांच्याबरोबर संस्थापकांमध्ये सुरेश दिनकर , वसंत साठे, शरद साठे, चंद्रकांत कवठेकर, शशिकांत ओक व श्रोत्री यांचा समावेश होता. त्यावेळी या संस्थेची सभासद संख्या तीस होती.

हळूहळू खोखोच्या विकासाबरोबर नवमहाराष्ट्र संघाचीहि प्रगती वाढू लागली. संघ नांवारूपाला येऊ लागला. खेळाडू निर्माण करण्याबरोबर खोखो संघटन करण्याचीहि जबाबदारी या संस्थेने स्वीकारली. त्याकरिता त्यांनी विविध शाळा व महाविद्यालये आदि शिक्षण संस्थांमध्ये लहान मुलांना शिकवण्याची योजना हाती घेतली. शालेय जीवनात जर खोखोचे धडे दिले गेले तर खोखो विषयीचे प्रेम मुलांमध्ये अधिक निर्माण होईल यादृष्टीनेच या संस्थेने प्रयत्न केले.

जिल्हा पातळीवर, राज्य पातळीवरील स्पर्धांच्या संयोजनामध्ये यश संपादन केल्यानंतर या संस्थेने १९७१ मध्ये अखिल भारतीय स्तरावर खोखो स्पर्धा आयोजित केली होती. गुरुवर्य पाटणकर यांच्या षष्ट्यब्दीपूर्ति आयोजित करणयत आलेल्या या स्पर्धेत उत्तम प्रतिसाद लाभला. नवमहाराष्ट्र संघाने उचललेले हे धाडसी पाऊल यशस्वी ठरले. त्यानंतर १९७४ मध्ये पुन्हा त्यांनी अखिल भारतीय पातळीवर खोखो स्पर्धा आयोजित केली.

**पुंडलिक स्पर्धा**

अश्विन पुंडलिक हा नवमहाराष्ट्र संघाचा अष्टपैलू व उदयोन्मुख खेळाडू होता. परंतु गिर्यारोहण करताना त्याचे अपघाती निधन झाले. त्याच्या स्मृतिप्रीत्यर्थ १९८० मध्ये नवमहाराष्ट्र संघाने अखिल भारतीय स्तरावर स्पर्धा आयोजित केली. त्यानंतर पुन्हा आजपासून त्यांनी रौप्यमहोत्सवी अखिल भारतीय खोखो स्पर्धा आयोजित केली आहे.

खोखो संघटन कौशल्यामध्ये अग्रेसर असलेल्या या संस्थेने गेली सतत तेवीस वर्षे आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे आयोजन केले आहे. हा एक विक्रमच असेल कदाचित. त्याचप्रमाणे बहुविध खेळ जिल्हा परिषदेच्यावतीने आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हा पातळीवरील आंतरशालेय स्पर्धांचे संयोजन हीच संस्था अनेक वर्षे करीत आहे.

केंद्र शासनातर्फे क्रीडापटूंना देण्यात येणाऱ्या अर्जुन पुरस्काराचा मान या संस्थेचे चिटणीस श्रीरंग इनामदार यांनी १९७५ मध्ये मिळविला. हा मान मिळविणारे ते महाराष्ट्रातील पहिलेच खोखोपटु आहेत. राज्य शासनातर्फे दरवर्षी देण्यात येणाऱ्या श्रीशिवछत्रपति क्रीडा पुरस्काराचा मान या संस्थेच्या अकरा खेळाडूंनी आतापर्यंत पटकाविला आहे. त्यामध्ये ख्यातनाम क्रीडावैद्यक तज्ज्ञ डॉ. मधुसूदन झंवर, श्याम पुरोहित, डॉ. प्रकाश शेठ , माजी उपमहापौर डा. सतीश देसाई, श्रीरंग इनामदार, रमेश राव, विलास देशमुख, अतुल वाकणकर, मिलिंद मराठे, संजय जोशी व राजीव मराठे यांचा समावेश आहे.

**अभिमन्यु पुरस्कार**

राष्ट्रीय खोखो स्पर्धेमध्ये उत्कृष्ट खेळ करणाऱ्या खेळाडूला एकलव्य पुरस्कार दिला जातो. नवमहाराष्ट्र संघाच्या सहा खेळाडूंनी आतापर्यंत हा बहुमान मिळविला असून त्यमध्ये सुहास वाघ, अरविंद पटवर्धन, डॉ. प्रकाश शेठ, सुरेश पोंक्षे, विलास देशमुख व मिलिंद मराठे यांचा समावेश आहे. ज्याप्रमाणे वरिष्ठ गटातील राष्ट्रीय स्पर्धेत सर्वोत्कृष्ट खेळाडूसाठी पुरस्कार दिला जातो. त्याचप्रमाणे कुमार गटासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये 'वीर अभिमन्यु पुरस्कार' हा सर्वोत्कृष्ट खेळाडूला देण्यात येतो. या संस्थेच्या किशोर राठी व राजेंद्र सुरा यांनी हा पुरस्कार मिळविला आहे.

आतापर्यंत झालेल्या तेवीस राष्ट्रीय स्पर्धांमध्ये १४ वेळा महाराष्ट्राचे कर्णधारपद या संस्थेच्या खेळाडूंनीच भूषविले आहे. डॉ. मधुसूदन झंवर, सुनील तांबे, डॉ. सतीश देसाई, श्रीरंग इनामदार, विलास देशमुख, मिलिंद मराठे, संजय जोशी यांनी हा मान मिळविला आहे. कनिष्ठ गटामध्ये गिरीश पोळेकर याने हा मान मिळविला आहे. लागोपाठ नऊ वेळा राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करण्याचा मान श्रीरंग इनामदार यांनी मिळविला आहे, हा मान मिळविणारे हे एकमेव खेळाडू आहेत.

**उपविजेता नवमहाराष्ट्र**

भाई नेरुरकर चषक ही स्पर्धा अखिल भारतीय स्तरावर हेणारी महत्त्वाची व नामांकित स्पर्धा समजली जाते. नवमहाराष्ट्र संघाने आतापर्यंत १४ पैकी ८ वेळा या स्पर्धेमध्ये

(पुढील मजकूर पान ४ वर)